अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर


सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## तर २०२४ मध्ये मोदी-शाहांना तुरुंगात टाकू; प्रकाश आंबेडकर यांचे वक्तव्य

**पुणे** : २०२४ मध्ये गैरभाजप आणि आरएसएसचं सरकार सत्तेत आलं तर नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांना तुरुंगात टाकल्याशिवाय राहणार नाही, असे वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर म्हणाले. ते पुण्यात बोलत होते. झुकानेवाला चाहिये, सरकार उसके सामने झुकती है... २०२४ मध्ये यांना झुकावं लागेल, हेच आव्हान मी देतोय, असेही प्रकाश आंबेडकर म्हणाले.



यावेळी प्रकाश आंबेडकर यांनी नरेंद्र मोदी यांना उत्तराधिकाऱ्यावरुन सवाल केला. ते म्हणाले की, 'नरेंद्र मोदी यांना सवाल आहे. मोदी नंतर दुसरा पंतप्रधान कोण? एकही माणूस आपल्या नजरेसमोर नाही, या देशाचे नेतृत्व करू शकतो असे कुणी दिसत नाही. काँग्रेस, राष्ट्रवादी, दक्षिणेतील, उत्तरमधील राज्यात पण हीच परिस्थिती आहे. एकही व्यक्ती राहिली नाही की तो त्याच्या राज्याच्या बाहेर जाऊन नेतृत्व करू शकतो, असेही आंबेडकर म्हणाले. भारताचे सोने गहाण ठेवले गेले. ३५००० टन सोनं बँक ऑफ इंग्लंड मध्ये ठेवले होते. मी विचारले तेव्हा पुढे बघू असे सांगितले गेले. नरेंद्र मोदी यांचा नवीन फंडा आहे की देश चालवण्यासाठी जेवढा निधी पाहिजे तेवढा जमत नाही. मग कारखाने विकून देश चालवला जात आहे.



मोदी यांना एका बाजूला बसवा आणि मी एका बाजूला बसतो आणि मी त्यांना चार प्रश्न विचारतो आणि त्यांनी उत्तर द्यावे. एकतर मोदी पाहिजे किंवा मोहन भागवत पाहिजे बाकी कोणी नको..., असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.३१ जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १२५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# बलात्कारातून जन्मलेल्या बाळाच्या बापाला २० वर्षे सक्तमजुरी

## पिडिता फुटली, फिर्यादी उलटली, डीएनए रिपोर्टवरून कोर्टाने शिक्षा ठोठावली

सुराज्य/सोलापूर

**शिक्षणासाठी आलेल्या नात्यातीलच एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी विशेष न्यायालयाच्या न्यायाधीश कविता शिरभाते यांनी २० वर्षे सक्तमजुरी आणि ५ हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा ठोठावली. विशेष म्हणजे या खटल्यातील पिडीत तरुणी, यासंदर्भात फिर्याद देणारी पिडितेचे आई या दोघीही फितूर झाल्या. मात्र पिडिता, पिडितेच्या पोटी बलात्कारातून जन्मलेले बाळ आणि आरोपी यांच्या डीएनए चाचणीचा अहवाल ग्राह्य धरून कोर्टाने ही शिक्षा ठोठावली.**

संतोष लक्ष्मण चव्हाण (वय ३५ रा.अक्कलकोट) असे या खटल्यात शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. तो रेल्वे कर्मचारी असून शिक्षणासाठी बाहेरगावाहून अक्कलकोटमध्ये आलेल्या नात्यातीलच एका अल्पवयीन मुलीवर त्याने बलात्कार केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला होता. पुण्यातील बंडगार्डन पोलीस ठाण्याच्या तपासी अंमलदाराची साक्ष तसेच पीडित अल्पवयीन असल्याचे माहिती असूनही आरोपीने तिच्यावर अत्याचार केल्याचे सरकार पक्षाने मांडलेले साक्षी, पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला वीस वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकारच्यावतीने ॲड. प्रकाश जन्नू, आरोपीच्यावतीने ॲड. इस्माईल शेख यांनी काम पाहिले. खटल्याचा तपास अक्कलकोटचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सी.बी.बेरड यांनी केला. कोर्ट पैरवी म्हणून पोलीस शिपाई दिनेश कोळी यांनी सहकार्य केले.



### डीएनए अहवालाने दाखवला बाळाचा बाप

दरम्यान अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी नवजात बाळ, पिडिता म्हणजे त्याची आई आणि आरोपी संतोष चव्हाण यांची डीएनए तपासणी केली. या तपासणीत पिडितेच्या बाळाचा बाप हा आरोपीच असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक छबू बेरड यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. सुनावणीदरम्यान पिडिता आणि पिडितेची आई फितूर झाली. मात्र न्यायालयाने डीएनए अहवालावरून आरोपीला शिक्षा सुनावली.

### खटल्याची पार्श्वभूमी

या खटल्यातील पिडीत अल्पवयीन मुलगी ही २०१५ साली शिक्षणासाठी म्हणून अक्कलकोटला आली होती. ती अक्कलकोटमध्येच राहत असताना लक्ष्मण चव्हाण हा तिच्यावर अत्याचार करीत होता. दि.२८ सप्टेंबर २०१९ रोजी पीडित मुलीच्या पोटात दुखत असल्याने ती घरी तिच्या घरी गेली. त्यावेळी तिच्या आईने तिला अक्कलकोटच्या दवाखान्यात दाखवले असता ती गरोदर असल्याचे आढळून आले. यानंतर पिडितेच्या आईने गर्भवती मुलीस उपचारासाठी पुणे येथील ससून हॉस्पिटलमध्ये दि. ३० सप्टेंबर २०१९ रोजी दाखल केले.

### ससूनमधून काढला पळ

अल्पवयीन पिडिता ही गर्भवती असल्याची माहिती ससूनच्या डॉक्टरांनी बंडगार्डन( पुणे) पोलीस ठाण्याला कळवली. बंडगार्डनच्या पोलिसांनी रुग्णालयात येऊन पिडितेच्या आईचा जबाब नोंदवला. त्यानंतर मात्र पिडिता आणि तिची आई या दोघींनी कोणालाही न सांगता दि.१३ ऑक्टोबर २०१९ रोजी ससून हॉस्पिटलमधून पळ काढला होता.

### पिडितेला झाला मुलगा

दरम्यान बंडगार्डनच्या पोलिसांनी बलात्कार आणि पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला करून हा प्रकार अक्कलकोट परिसरात घडल्याने तो गुन्हा अक्कलकोट दक्षिण पोलिसांकडे वर्ग केला होता. त्यानंतर अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी पिडितेचा शोध घेऊन पिडितेला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पाठवले. दि.२१ नोव्हेंबर २०१९ रोजी पिडिता प्रसूत झाली आणि तिला मुलगा झाला.



## दत्तनगर येथे गारमेंट कारखान्यांना लागली आग

### लाखो रुपयांचे नुकसान; कोणतीही जीवित हानी नाही

**सोलापूर** : दोन अडीच महिन्यापासून शहरातील गारमेंट कारखान्यांना वारंवार आगी लागत आहेत. यामुळे उद्योजकांचे कोट्यावधीचे नुकसान होत आहे. सोमवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास अशाच प्रकारे शहरातील दत्तनगर भागात असलेल्या गड्डम आणि कुरापाटी यांच्या रेडिमेड गारमेंट कारखान्याला मोठी आग लागली.या आगीत लाखो रुपयांचे शिलाई साहित्य कच्चामाल रेडिमेड कपडे जळून खाक झाले. परंतु जीवित हानी झाली नसल्याची नाही.

या घटनेची हकिकत अशी की, सोलापूर शहराच्या दत्त नगर लाल बावटा कार्यालय शेजारी माहेश्वरी मंदिरालगत गड्डम आणि कुरापाटी या दोघांचे रेडीमेड गारमेंट फॅक्टरीज आहेत.सोमवारी सकाळी आठ वाजण्याच्या दरम्यान दोन्ही गारमेंट्स बंद असताना अचानक या गारमेंट फॅक्टरीला आग लागली. कुरापाटी गारमेंट जागेचे मालक उमाशंकर कामिनी यांनी याबाबत कुरापाटी यांना आग लागल्याबाबत कळवले.तसेच अग्निशामक दलालाही त्यांनी कळवले. कुरापाटी यांनी येऊन तात्काळ कुलूप उघडून पाहिले असता कारखान्यातील तयार माल, तयार युनिफॉर्म, कच्चा माल, शिलाई मशीन, कापडी गाठी असा जवळपास सात ते आठ लाखाचा माल जागेवर जळून खाक झाला. तर नागेश गड्डम यांच्या गारमेंटला लागलेल्या आगीत ८ शिलाई मशीन्स, कटिंग मशीन,इस्त्री मशीन, कच्चामाल,तयार माल असा जवळपास १५ लाखाचा माल आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. गोवर्धन शेट्टी यांनी याबाबत अग्निशामक दलाला कळवले. अग्निशामक दलाच्या नऊ गाड्यांनी ही आग आटोक्यात आणली.परंतु तोपर्यंत दोन्ही गारमेंट जळून खाक झाले होते.दोन तासानंतर ही आग विझवण्यात आली. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

## उसाच्या पिकात बेवारस महिलेचा मृतदेह

सुराज्य/विरवडे बु.

कामती पोलीस स्टेशनच्या हद्दीत असणारे शिंगोली येथील शेतातील उसाच्या पिकात बेवारस महिलेचा मृतदेह आढळून आला असल्याचे कामती पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश माने यांनी सांगितले आहे. सोमवार दि. ३० जानेवारी रोजी दुपारी बाराच्या पूर्वी मयत झालेले अंदाजे २५ ते ३० वर्ष वयोगटातील रंगाने गोरी असणारी व पाच फूट दोन इंच बेवारस महिलेचा मृतदेह आढळून आले आहे. संबंधित महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पाठविले आहे. अधिक चौकशीसाठी कामती पोलीस स्टेशन येथे संपर्क करण्याचे आवाहन कामत पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## पतीच्या आत्महत्येप्रकरणी पत्नीवर गुन्हा दाखल

सुराज्य/मोहोळ

खुनेश्वर येथे गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या व्यक्तीने लिहून ठेवलेल्या चिठ्ठीवरून मृताच्या दुसऱ्या पत्नीच्या विरोधात मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. २६ जानेवारी रोजी ते २७ जानेवारीच्या सकाळी साडेआठ वाजण्याच्या दरम्यान पर्यंत मोहोळ तालुक्यातील खुणेश्वर येथील वैभव कालिदास मगर या प्राध्यापक तरुणाने स्वतःच्याच शेतातील झाडाला गळफासाने आत्महत्या केली होती.





वैभव मगर याच्यावर पहिली पत्नी सीमा हिच्या खून प्रकरणी गुन्हा दाखल होता. त्या गुन्ह्यांमध्ये त्याला जन्मठेपेची शिक्षा लागली होती.तो पुणे येथील येरवडा जेलमध्ये शिक्षा भोगत होता. दरम्यान १३ जानेवारी २०२३ रोजी तो संचित रजेवर खुनेश्वर या मूळ गावी आला होता. दरम्यान २६ जानेवारी रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास तामलवाडी पोलीस ठाणे येथे हजेरी देऊन येतो असे म्हणून घरी सांगून गेला होता. त्यानंतर त्याने दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे दिसले.त्यावेळी मृत वैभव याने मृत्युपूर्व एक चिठ्ठी लिहून त्यावर माझे मरणास माझी दुसरी पत्नी डॉ. प्रियांका सुरेश मोटे (रा. नरखेड) ऊर्फ प्रियंका वैभव मगर ही जबाबदार असलेबाबत चिठ्ठीमध्ये नमूद केले होते.

सदर चिठ्ठी पोलिसांनी जप्त केली होती. त्याचिठ्ठीच्या आधारे वैभव याची आई निर्मला कालिदास मगर यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

वैभव ने दुसरे लग्न केल्याचे आम्हाला माहीत नव्हते. दरम्यान त्यांनी आत्महत्या केल्यानंतर त्याच्या खिशामध्ये आढळून आलेल्या चिठ्ठीमध्ये माझ्या मृत्यूस माझी दुसरी पत्नी डॉ. प्रियांका मोटे हीच जबाबदार असून दुसऱ्या पत्नीचे व्हॉटस्ॲपवरुन चर्चा झाली. त्यानंतरच मुलाने आत्महत्या केली. व तिच्या त्रासाला कंटाळूनच मी आत्महत्या करीत असल्याचे लिहून ठेवले असल्यामुळे डॉक्टर प्रियांका हिच्यावर वैभव याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी निर्मला मगर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक पोलीस उपनिरीक्षक राजेन्द्र राठोड करीत आहेत.

## कालवा फुटून ३०० एकरचे नुकसान, पंचनामे चालू

सुराज्य/सोलापूर

उजनीचा डावा कालवा फुटल्याने दोन तालुक्यातील सुमारे ३०० एकरपेक्षाही अधिक क्षेत्रावरील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्या नुकसानीचे तातडीने पंचनामा करून अहवाल सादर करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली.

रविवारी २९ जानेवारी रोजी उजनी धरणातून येणारा मोठा डावा कालवा ११३ किमी लांबीचा आहे. रब्बी आवर्तनासाठी पाणी सोडण्यात आले होते. पण, पाटकूल हद्दीमध्ये सकाळी कालवा फुटल्याने उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले. काही ठिकाणी उसाची नवीन लागवड केली होती. त्या क्षेत्रातील सर्व पिकांसह मातीही खरडून



गेली आहे. काही ठिकाणी पाणी असल्याने पंचनामे करण्यासाठी जाता आलेले नाही. पण, ज्या ठिकाणी शक्य आहे, तेथील पंचनामे त्वरित करण्याच्या सूचना दिल्या आहे. सतत पाऊस किंवा अतिवृष्टी अशी नैसर्गिक आपत्ती नसल्याने त्या अंतर्गत मदत कशी देणार ? त्या संदर्भातील पंचनामे करून स्वतंत्र अहवाल शासनाकडे पाठविण्यात येईल. तसेच, पाटबंधारे विभागही त्या घटनेबाबत अहवाल करून पाठवेल, असेही त्यांनी सांगितले.

## घरकुलाचे आमिष दाखवून ग्रामसेवकाकडून तरुणीवर अत्याचार

**सोलापूर** : घरकुल मंजुर करुन देण्याच्या आमिषाने ग्रामसेवकाने तरुणीवर अत्याचार केला. याबाबत विजापूर नाका पोलीस ठाण्यात ग्रामसेवकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.कांता जैमुर राठोड (रा.सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या ग्रामसेवकाचे नाव आहे. पीडितेला समाजकल्याण अधिकाऱ्याला सांगून घरकुल मंजुर करून देण्याचे आमिष राठोडने दाखविले. त्यासंदर्भात घटनेदिवशी समाजकल्याणचे अधिकारी यांची भेट घेण्यासाठी पीडितेला बोलाविण्यात आले. तेथून दुचाकीवरून जुळे सोलापूर भागातील बॉम्बे पार्कजवळील निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर आरोपीने अत्याचार केला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता थोडे अपडेट व्हा!!

कल्याण

338-48-170

मेन बाजार

-------

## वाळू चोरीचा स्टेटस ठेवून केली हवा, आयजी म्हणाले, अशांना एमपीडीए लावा

**पंढरपूर** : पंढरपूरच्या भीमा नदीकाठी कायमच वाळूमाफियांनी उच्छाद मांडलेला असतो. अशातच चक्क आता वाळूमाफियांनी धडाकेबाज वाळू चोरीचा व्हिडिओ काढून व्हॉट्सॲप वर स्टेटस ठेवत प्रशासनाला आव्हान देत वाळू चोरी सुरू केली आहे.

त्यामुळे पंढरपूर पोलीस प्रशासन आणि महसूल प्रशासनात मोठी खळबळून आली आहे. धडाकेबाज व्हॉट्सॲप स्टेटस आणि वाळू चोरीचा धिंगाणा हा भीमातीरी अद्यापही सुरू आहे. महसूल प्रशासनाने वाळू माफियाच्या मुसक्या आवळण्यासाठी खास पथके बनवले आहेत. मात्र महसूल आणि पोलीस विभागातील खालच्या कर्मचाऱ्यांना हाताशी धरून यारीच्या साह्याने वाळू उपसा केला जात आहे. एका बाजूला तहसीलदार सुशील बेलेकर स्वतः वाळू माफियांच्या मुसक्या आवळण्यात व्यस्त असताना स्थानिक कर्मचाऱ्यांना हाताशी धरून वाळूमाफिया दिवसाढवळ्या वाळू उपसत आहेत. पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांची बदली झाल्यानंतर या भागातून हप्ते खोरी पुन्हा सुरू झाली आहे. सरकोली परिसरातील एका वाळूमाफियाने फेसबुकला आपल्या स्टेटस वर यारी च्या साह्याने वाळू काढतानाचा व्हिडिओ अपलोड करून मोठी खळबळ उडून दिली आहे. त्यामुळे महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या नाकावर टिचून वाळू माफिया वाळू उपसताना दिसत आहेत महसूल आणि पोलीस प्रशासनाने सरकोली येथील वाळू उपसा बंद करण्याची मागणी सरकोली ग्रामस्थांनी केली आहे.

### आयजींचे निर्देश, पोलीस दलात खळबळ

राजरोजपणे अवैध पद्धतीने वाळू उत्खनन करणाऱ्या तस्करांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांना दिले. तात्काळ व्हाट्सअप स्टेटसची दखल घेऊन तपास कार्यान्वित करा आणि एमपीडीए अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचे ही आदेश यावेळी देण्यात आले. त्यामुळे वाळू तस्करांसह पोलीस प्रशासनातही मोठी खळबळ उडाली आहे.

